**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.१ जितेंद्र मनसुखलाल गांधी यांचा शपथेवर पुढील सरतपास त्यांचे वकील श्री.एस.ए. काकडे यांचेमार्फत :**

७. मी या प्रकरणात निशाणी क्र.१६ वर माझे सरतपासाचे शपथपत्र दाखल केले आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यावर माझी सही देखील आहे. तसेच मी या प्रकरणात निशाणी क्र.३ सोबत कागदपत्रे दाखल केलेली आहे.

आता मला दि.२२/०५/२०२३ रोजीचा मुळ धनादेश दाखविण्यात आला. त्यावर आरोपीची सही असून ती सही मी ओळखतो. त्यास **नि.क्र.१८** देण्यात आला. सदरचा धनादेश आम्ही वटण्याकामी अहमदनगर मर्चंट बॅक, शाखा–तारकपुर, अहमदनगर येथे जमा केला असता तो न वटता परत आला. त्याबाबतचा बॅकेचा दि.२७/०६/२०२३ रोजीचा मेमो मी या प्रकरणात दाखल केलेला आहे. (त्यास निशाणी क्रमांक देण्यास आरोपीचे विव्दान वकील श्री.ए.व्ही. राशिनकर यांनी आक्षेप नोंदविला व असे कथन केले की, सदर मेमोवर बॅकेचा शिक्का नाही. सबब, त्यास निशाणी क्रमांक देण्यात येवु नये. त्यावर फिर्यादीचे वकील यांनी असे कथन केले की, संबंधित मेमोवर बॅकेच्या अधिका–यांची सही असून त्यास निशाणी क्रमांक देण्यात यावे. तथापी, सदर मेमोवर बॅकेचा शिक्का नसल्याकारणाने तसचे सदर मेमो शाबीत करण्याकामी फिर्यादीतर्फे बॅक प्रतिनिधी तपासण्यात येणार असल्याचे फिर्यादीच्या वकीलांनी कथन केले. सबब, सदर मेमोस **आर्टीकल 'अ'** देण्यात येते.)

८. आरोपीने दिलेला धनादेश न वटल्याकरणाने आम्ही आरोपीला आमच्या वकीलांमार्फत नोटीस पाठविलेली होती. आता मला सदर नोटीसीची स्थळप्रत दाखविण्यात आली. ती तीच असून त्यावर माझे वकीलांची सही आहे. त्यास **नि.क्र.१९** देण्यात येतो. तसेच सदरची नोटीस पाठविल्याबाबतची पोस्टाची पावती मी या प्रकरणात दाखल केलेली आहे. त्यास **नि.क्र.२०** देण्यात येतो. आरोपीला पाठविलेली नोटीस त्याने न स्वीकारता परत आल्याचे पोस्टाचे बंद पाकिट मी प्रकरणात दाखल केलेले आहे. त्या बंद पाकीटास **नि.क्र.२१** देण्यात येते.

(सदरचे बंद पाकीट आज आरोपींच्या विव्दान वकीलांसमोर खुल्या न्यायालयात उघडण्यात आले.) सदर बंद बाकीटातुन एक नोटीस दिसून आली. सदरची नोटीस ही तिच नोटीस आहे जी माझे विव्दान वकीलांनी आरोपीला पाठविली होती. त्यातील मजकुर व निशाणी क्र.१९ वरील नोटसीच्या स्थळप्रतीमधील मजकुर सारखाच आहे. त्यास **नि.क्र.२२** देण्यात येते. तसेच आरोपीला पाठविलेली नोटीस त्याला मिळाल्याबाबत ऑनलाईन ट्रॅकिंग रिपोर्टची झेरॉक्स मी या प्रकरणात दाखल केलेली आहे. त्यास **आर्टीकल 'ब'** देण्यात येते.

सरतपास पुर्ण.

**शपथेवर उलटतपास आरोपीतर्फे त्यांचे वकील श्री.ए.व्ही. राशिनकर :**

९. माझे शिक्षण बी.ए. पर्यंत झालेले आहे. मी सध्या डी.टी.पी. चे जाहिरात ऐजन्सीचे काम करतो. मी डी.टी.पी.चा व्यवसाय सन २०१७ पासुन करतो. सन २००९ साली मी इंश्युरन्स कंपनीत काम करत होतो हे दाखविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा मी या प्रकरणात दाखल केलेला नाही. जे.एम.जी. चे जाहिरात व्यवसाय करण्याचे काम मी करत असल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा मी या प्रकरणात दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी इंश्युरन्स व जाहिरातीचे काम करतच नसल्याने त्याबाबतची कागदपत्रे मी प्रकरणात दाखल केलेली नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपासातील परिच्छेद क्र.१ मधील मजकुर नामे आरोपीची व माझी ओळख झाली व मैत्री झाली हे मी खोटे नमूद केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपासातील मजकुर नामे 'आरोपीमध्ये व माझेमध्ये विश्वासाचे व मैत्रीचे नाते निर्माण झाले' हे खोटे नमूद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी व आरोपी कधीही मित्र नव्हतो.

**आरोपीच्या वकीलांच्या तोंडी विनंतीवरून तसेच आरोपीचे विव्दान वकील व फिर्यादीचे विव्दान वकील यांनी प्रकरण मेडीएशनला पाठविण्यात यावे अशी तोंडी विनंती केली. सबब, उर्वरित उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

(न्यायालयात साक्षीदारासमक्ष असणा–या स्क्रीनवर साक्षीदाराचा संपुर्ण जबाब हा साक्षीदाराला वाचुन दाखविण्यात आला व त्याने त्याबाबतची काहीही तक्रार नसल्याचे त्यांचे वकीलांसमक्ष तोंडी सांगितले.)

माझे समक्ष जबाब श्रवणोत्तर स्वीकृत,

SACHIN RAJARAM SHINDE
Digitally signed by SACHIN RAJARAM SHINDE
DN: cn=SACHIN RAJARAM SHINDE, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6949745, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2025.07.18 17:16:14 +0530

**(एस.आर. शिंदे)**

**दि.१८/०७/२०२५**

अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.२०, अहमदनगर.